सद्‌भावपूर्वक वागणाऱ्या व्यक्तींना संरक्षण. [1][१९१क. [2][कलम १९१ब किंवा १९१बअ] यांच्या तरतुदींच्या अनुरोधाने सद्‌भावपूर्वक केलेल्या कोणत्याही कृतीच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीवर कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेविषयक कार्यवाही दाखल करता येणार नाही.

विवक्षित कलमे लागू नसणे. [1][१९१ड. कलमे १८० ते १८२, १८५ ते १८८, १९०, १९१, १९८ व कलम २०० चे पोट-कलम (२) यातील दुसरे वाक्य यात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट कलम १९१अ खाली आकारण्याजोग्या कराच्या संबंधात लागू असणार नाही.]

[3][नाट्यगृह कर]

चित्रपटगृहे, नाट्यगृहे, सर्कशी, आनंद बाजार आणि इतर प्रयोगांवर किंवा खेळांवर कर

नाट्यगृह कर. १९१ई. (१) यात यापुढे जी तरतूद केली असेल त्याखेरीज एरव्ही, राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेअन्वये याबाबत विनिर्दिष्ट करील अशा तारखेपासून चित्रपटगृहे, नाट्यगृहे, सर्कशी, आनंद बाजार व इतर प्रयोग किंवा खेळ यांवर या अधिनियमात नाट्यगृह कर म्हणून निर्देशिलेला कर बसवण्यात येईल व तो कर महानगरपालिकेस देण्यात येईल.

(२) नाट्यगृह कर हा, नाट्यगृह, चित्रपटगृह, सर्कस, आनंद बाजार किंवा करमणुकीच्या इतर जागा यांच्या संबंधात, त्या ठिकाणी किंवा त्यामध्ये आणि या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये किंवा त्याखाली विहित केलेल्या दराने पैसे घेऊन जेथे लोकांस प्रवेश देण्यात येतो अशा प्रत्येक प्रयोगाबद्दल किंवा खेळाबद्दल बसवण्यात येईल.

(३) [4][अनुसूची ग] यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांपेक्षा अधिक नसतील, असे कलम १२८ अनुसार जे दर महानगरपालिका वर्षावर्षाला ठरवील, अशा दरांपेक्षा अधिक दराने नाट्यगृह कर बसवता येणार नाही.

नाट्यगृह कर भरण्याचे दायित्व. १९१फ. करमणूक कार्यक्रमाचा प्रत्येक स्वामी, व्यवस्थापक किंवा प्रभारी व्यक्ती यांवर नाट्यगृह कर देण्याचे दायित्व असेल आणि अशी व्यक्ती उक्त कर प्रत्येक खेळ सुरू होण्यापूर्वी भरील अथवा जर वेगवेगळे खेळ नसतील तर, कोणत्याही दिवशी करमणुकीच्या खेळास कोणत्याही व्यक्तीस प्रवेश देण्यापूर्वी भरील :

परंतु, आयुक्त, [5][***] तो ज्या अटी व शर्ती लादील अशा अटींच्या व शर्तींच्या अधीनतेने, खेळांच्या मालिकांच्या किंवा एका आठवड्याच्या किंवा एका महिन्याच्या कालावधीच्या संबंधात उक्त कर एका ठोक रकमेने भरण्याची परवानगी देऊ शकेल.

नाट्यगृह कर भरण्याचे दायित्व असणाऱ्या व्यक्तींची नोंदवही. १९१ग. आयुक्त एक नोंदवही ठेवील आणि तीत वेळोवेळी पुढील गोष्टींची नोंद करण्यात येईल,—

(अ) नाट्यगृह कर भरण्याचे दायित्व असलेल्या व्यक्तींची यादी ;

(ब) अशा व्यक्तींच्या मालकीची किंवा त्यांच्या ताब्यात असलेली चित्रपटगृहे, नाट्यगृहे व करमणुकीच्या इतर जागा यांचा तपशील ;

(क) अशा प्रत्येक व्यक्तीने द्यावयाच्या कराची अंदाजे रक्कम व ती ज्या कालावधीच्या संबंधात देण्याजोगी असेल तो कालावधी.

---

[1] सन १९८३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ३ आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम २ अन्वये कलमे १९१क आणि १९१ड समाविष्ट करण्यात आली.

[2] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५९, कलम १४ अन्वये "कलम १९१ब, पोट-कलमे (२), (३) व (५)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ६६ अन्वये हे शीर्षक आणि कलमे १९१ई ते १९१के समाविष्ट करण्यात आली.

[4] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २९ अन्वये "अनुसूची ग-१" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८३ अन्वये "प्रभारी सदस्याच्या मंजुरीने" हा मजकूर वगळण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner